**फौजदार किरकोळ अर्ज नं.६३/२०१८**

मायावती जगन्नाथ पाटील वि. जगन्नाथ पाटील

**निशाण नं.३७/क/लगत**

**<u>सामनेवाला तर्फे साक्षीदार यांचा उलटतपास अर्जदार तर्फे वकील श्रीमती. आय. पी भोसले यांचे मार्फत पुन्हा शपथेवर सुरु,</u>**

१३. हे म्हणणे खरे आहे की, मी बाळाबाई पोवार यांचेसोबत दुसरा विवाह केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा विवाह बाळाबाई पोवार यांचेसोबत कायदेशीर झाल्याचे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, मी बेकायदेशीरपणे बाळाबाई यांचे सोबत विवाह केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी तीनही मुले मिळवती आहेत. तीघेही मुले वेगळी राहतात. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या तिनही मुलांना मी वाटून दिलेले असून ते वेगळे राहत असल्याचे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या मुलांची नावे माझ्या वाड वडिलार्जित प्रॉपर्टीवर लावली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सदर प्रॉपर्टीवर मी माझ्या पत्नीचे नाव देखील लावलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, केवळ पोटगी देणे टाळण्याकरिता मी बाळाबाई व मुलांची नावे प्रॉपर्टीवर लावली आहेत. हे म्हणणे खरे आहे की,मुलांच्या नावावर असलेले पिक कारखान्याला पाठविले जाते. हे म्हणणे खरे नाही की, बाळाबाई यांच्या नावावर ऊस पीक पाठवितो. हे म्हणणे खरे नाही की, मी सर्व संपत्तीचा एकत्रित उपभोग घेत आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१७ मी सेवानिवृत्त झालो आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन १९९६ ते २००४ या कालावधीत मी नोकरीला असल्याचे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, मला हदयविकाराचा त्रास होतो हे मी माझ्या प्रतिज्ञापत्रात कथन केल्याचे खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, माझी बायपास सर्जरी झाली व त्यासाठी मला दोन लाख रुपये खर्च आला हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, मला लोकांकडून पैसे घेवून उपचाराकरिता खर्च करावा लागला, फंड व पेन्शनवर कर्ज काढावे लागले हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, शस्त्रक्रियेनंतर मला नोकरीच्या

ठिकाणाहून स्वेच्छानिवृत्ती घ्यावी लागली हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, माझी एन्जीयोप्लास्टी सन २०१० मध्ये झाल्याचे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, मला अजूनही हदयविकाराचा त्रास होत असून मला डॉक्टरांनी बायपास सर्जरी करायला सांगितल्याचे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, माझी बायपास सर्जरी झालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला कोरोना काळात अ ॅडमीट करावे लागले व मला एक लाख पंचवीस हजार खर्च आल्याचे मी खोटे सांगतो. मी अजून कोणाची साक्ष घेणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी जमीन कोरडवाहू आहे व त्यापासून ऊस पीक होत नाही हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, हदयविकार झालेली माणसे शेतात काम करू शकतात. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, मला होत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी रोज शेतात कामाला जातो. माझी दैनंदिन कामे मी स्वतः करतो. हे म्हणणे खरे नाही की, माझी कौटुंबिक जबाबदारी घेण्याची क्षमता आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी शारिरीकदृष्टया सदृढ आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी आर्थिक परिस्थिती चांगली आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराच्या मागणीप्रमाणे वाढीव पोटगी देण्याची माझी ऐपत आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार हिला पोटगी द्यायला लागू नये म्हणून मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत ,

सही/-

**(के.दि.काकतकर)**

दिनांक. १९.०१.२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा